महाराष्ट्र विकास सेवा, गट-अ मधील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करणे, तसेच त्यांना अनुज्ञेय असलेल्या वार्षिक वेतनवाढी मंजूर करणेबाबत.
राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२००६.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः मविसे-१०/२०१३/प्र.क्र.२३७/आस्था-३ अ

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: १२ एप्रिल, २०१९

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक : मविसे १०/२००९/ प्र.क्र.२०४/आस्था-३ दिनांक १५.०२.२०१०,
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : हिंभाप-१००१/१२४५/प्र.क्र.८४/०२/२०-ब, दि.२२.१०.२००२,
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही/प्र.क्र.५/९४/आठ, दि.०३.०२.१९९४,
४) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अधिसूचना क्रमांक : पी १ (२) (३९)/ एप्रिल,२०११/ एक, दि.३०.०४.२०१२.

<u>आदेश :-</u>

संदर्भाधीन शासन निर्णय क्र.१ अन्वये श्री.संदीप नंदकुमार कोहीणकर यांची महाराष्ट्र विकास सेवा गट-अ संवर्गात परिविक्षाधीन अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. तसेच संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ नुसार श्री. कोहीणकर यांनी परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी (जसे कामकाज समाधानकारक असणे, मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे , वर्तणूक शोभनीय असणे, तसेच परिविक्षाधीन काळात त्यांनी उपभोगलेल्या रजा विचारात घेणे) समाधानकारकपणे पूर्ण केल्या आहेत.

२. तसेच संदर्भ क्र.४ येथील अधिसूचनेनुसार श्री. कोहीणकर हे दि.१९ ते २१ मे, २०११ या कालावधीत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-१ या विभागीय परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे खालील तक्त्यातील रकाना क्रमांक (पाच) मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यास शासन मंजूरी देत आहे. त्याप्रमाणे श्री. कोहीणकर यांना अनुज्ञेय असलेल्या वार्षिक वेतनवाढी देवून त्यांची वेतननिश्चिती तात्काळ करण्यात यावी.

अ. क्र.	परि.अधिकाऱ्याचे नाव	रुजू झाल्याचा दिनांक	परिवीक्षाधीन कालावधीत घेतलेल्या रजा	परिवीक्षाधीन कालावधी समाप्त केल्याचा दिनांक
१	२	३	४	५
१	श्री. संदीप नंदकुमार कोहीणकर	दि. २२.२.२०१०	निरंक	दिनांक २३.२.२०१२

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०४१२११३३१६५१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Natha Savane

Digitally signed by Rajendra Natha Savane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=0a2ac5ab6ca0075cc776c90ec03925f2eb8727640eacf311beb6f68d63939303, serialNumber=f049989dbbef93340e9edd88af960a0963746d42baa5c948405b62e821529a99, cn=Rajendra Natha Savane
Date: 2019.04.12 14:56:13 +05'30'

(रा.ना.सवने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, नाशिक/ पुणे
२. मुख्य कार्यकारीअधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, पुणे.
३. महालेखापाल, महाराष्ट्र १-२/ मुंबई/नागपूर.
४. संबंधित अधिकारी द्वारा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे.
५. कार्या, आस्था-२, कार्या-आस्था-३ ग्राम विकास विभाग.
६. निवडनस्ती आस्था ३ अ.